**जिल्हा परिषद** • प्रशासनाला मिळेना अधिकृत माहिती, कोरोना अहवालांवर परिणाम

# 1300 आरोग्य कर्मचाऱ्यांचे 'अहवाल बंद' आंदोलन सुरू

**प्रतिनिधी** | नगर

राज्याच्या आरोग्य खात्यात काम करणाऱ्या नियमित आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी दोन दिवसांपासून अहवाल बंद आंदोलन सुरू केले आहे. यात नगर जिल्हा परिषदेतील सुमारे तेराशे कर्मचारी सहभागी झाले आहेत. या आंदोलनाचा कोरोनाशी संबंधित दैनंदिन रिपोर्टिंगवरही परिणाम झाला आहे. या आंदोलनामुळे प्रशासनाला अचूक आकडेवारी मिळत नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी वेतन नियमित व्हावेत, वर्ग ३ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, सुधारित प्रवास भत्ता मिळावा, जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावीत यासह अन्य मागण्यांसाठी गुरूवारपासून 'अहवाल बंद' आंदोलन पुकारले आहे. त्यात जिल्ह्यातील १ हजार ३०० आरोग्य कर्मचारी सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी संघटनेने हे आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात शुक्रवारपासून जिल्ह्यातील नियमित आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानचे आरोग्य कर्मचारी सहभागी झाले आहेत, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष विलास शेळके आणि सचिव संजीव दुसा यांनी दिली. जिल्ह्यातील ९६ आरोग्य कर्मचाऱ्यांना स्थायीत्वाचा वर्षभरपासून रखडलेला लाभ देण्यात यावा, २९ आरोग्य कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करावी, राष्ट्रीय ग्रामीण अभियानाचे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घ्यावे, सातव्या वेतन आयोगाप्रमाणे दहा, वीस आणि तीस वर्षांनंतर आश्वासित योजनेचा लाभ देण्यात यावा आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

राज्य सरकारने या मागण्या मान्य न केल्यास ऐन कोरोना काळात आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. शनिवारी सकाळी नव्याने अवघे ५ कोरोना बाधित असल्याचे समोर आले. त्यानंतर सायंकाळच्या अहवालात जिल्ह्यात ४०५ कोरोना बाधित असल्याचे समोर आले. आरोग्य कर्मचाऱ्यांचा अहवाल बंदचा हा परिणाम असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. हे आंदोलन लांबले, तर प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## वेतन नियमित करा, रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी

### ...अन् वस्तुस्थिती अशी होती कोरोनाची

गुरूवारी सकाळी जिल्हा प्रशासनाने कोरोनाच्या जाहीर केलेल्या आकडेवारीत पहिल्यांदा कोरोनाच्या एकूण रुग्णसंख्येत फक्त पाच रुग्णांची भर पडल्याचे सांगण्यात आले. ही आकडेवारी पाहून अनेकांना सुखद धक्का बसला. परंतु कोरोनाचा संसर्ग कमी होत असल्याचे वाटत असताना आरोग्य कर्मचाऱ्यांनी अहवाल बंद आंदोलन पुकारल्याची माहिती समोर आली. त्यामुळे आकडेवारीबाबत शंका निर्माण झाली.




- **आरोग्य विभागात**
  - ९२ आरोग्य सहायक पुरुष,
  - ८४ सहायक महिला,
  - ३६० आरोग्य सेवक,
  - ४९५ आरोग्य सेविका
- **राष्ट्रीय आरोग्य अभियानात**
  - ६२ एएनएम,
  - १७८ कंत्राटी आरोग्य सेविका

**१२८०** एकूण कर्मचारी

### आम्ही जनतेला वेठीस धरले नाही

*• कोरोनाच्या काळातही सर्व कर्मचारी इमाने इतबारे कर्तव्य बजावत आहेत. जवळपास नऊशे रिक्त जागा आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे. आमची कोणाला फिकीर नाही. कर्मचाऱ्यांचा विमाही काढलेला नाही, म्हणून आमचे आंदोलन सुरु केले आहे. सुटीच्या दिवशीही काम सुरु आहे. जनतेला आम्ही वेठीस धरलेले नाही. फक्त प्रशासनाला जाणीव होऊन मागण्या मान्य व्हाव्यात, ही अपेक्षा आहे.''*

**संजीव दुसा,** सचिव, जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी संघटना.

### असे आहे आंदोलनाचे स्वरुप

आरोग्य विभागातील तेराशे कर्मचारी अहवाल बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. म्हणजे कोरोना काळात सर्व कर्मचाऱ्यांचे काम सुरु असले, तरी त्याचा अहवाल वरिष्ठांना द्यायचा नाही, असे आंदोलनाचे स्वरुप आहे. याचा प्रत्यक्ष कामावर परिणाम होत नसला, तरी अधिकाऱ्यांना दैनंदिन माहिती मिळत नसल्याने त्यांची अडचण होत आहे.

लोकमत

# शहरातील कोरोना बाधितांची संख्या निम्म्याने घटली

## दिलासादायक : चाचण्यांचा वेग वाढला, आरोग्य पथकाकडून रॅपिड अँन्टीजेन चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : नगरकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. गेल्या दोन दिवसांपासून नगर शहरातील कोरोना बाधितांची संख्या निम्म्याने घटली आहे. मागील आठवड्यात शहरात दिवसाला २०० ते २५० जणांची चाचणी पॉझिटिव्ह येत होती, ती संख्या आता दिवसाला ९० ते १०५ पर्यंत खाली आली आहे.

महापालिकेच्या कोविड चाचणी केंद्रात शनिवारी २५० नागरिकांच्या स्त्रावाचे नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी २२ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत. नगर शहरातील कोरोना बाधितांचा आकडा १६ हजार झाला आहे. यापैकी १४ हजार ५२२ रुग्ण बरे झाले आहेत. कोरोनामुळे शहरातील ३०६ जणांचा मृत्यू झाला आहे. दहा दिवसांत कोरोना बाधितांची संख्या स्थिर असून महापालिकेने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अभियान हाती घेतले आहे. त्यासाठी १७० पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. आरोग्य पथकामार्फत घर ते घर तपासणी करण्यात येत आहेत. आरोग्य पथकांना महापालिकेकडून एक हजार रॅपिड अँन्टीजेन किट देण्यात आल्या आहेत. सर्दी, खोकला, ताप, श्वास घेण्यास त्रास, यासारखी लक्षणे आढळून येणाऱ्यांची रॅपिड अँन्टीजेन तपासणी करण्यात येत आहे. तपासणीचा वेग वाढविण्यात आल्याने रुग्ण संख्या वाढेल, असा अंदाज होता. परंतु, रुग्णांची संख्या निम्म्याने घटल्याने आरोग्य यंत्रणेसह सर्वांनाच दिलासा मिळाला आहे. तपासणी केलेल्यांमध्ये रक्तदाब, मधुमेह यासारखे आजार असलेले ९ हजार ९ रुग्ण आढळून आले आहेत. अभियानातून आतापर्यंत १३२ जणांना कोविड चाचणी करण्याचा सल्ला आरोग्य पथकाकडून देण्यात आला आहे. अभियान दोन टप्प्यांत राबविण्यात येत असून, पहिला टप्पा १० ऑक्टोबरपर्यंत सुरु राहणार आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### शहरातील ५३ हजार घरांत पोहोचले अभियान

- नगर शहरातील ७५ हजार घरांत ३ लाख ९८ हजार नागरिक वास्तव्यास असल्याचा महापालिकेचा अंदाज आहे. यापैकी ५३ हजार ८८१ घरांमधील २ लाख १७ हजार ७७६ नागरिकांची तपासणी करण्यात आली आहे.



- तपासणी केलेल्या नागरिकांमध्ये कोरोना बाधित रुग्णांची संख्या कमी आहे. म्हणजे तपासणीचे नगर शहरातील काम ७५ टक्के पूर्ण झाल्याचे दिसते आहे.

लोकमत

# शहरातील कोरोना बाधितांची संख्या निम्म्याने घटली

## दिलासादायक : चाचण्यांचा वेग वाढला, आरोग्य पथकाकडून रॅपिड अँन्टीजेन चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** नगरकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. गेल्या दोन दिवसांपासून नगर शहरातील कोरोना बाधितांची संख्या निम्म्याने घटली आहे. मागील आठवड्यात शहरात दिवसाला २०० ते २५० जणांची चाचणी पॉझिटिव्ह येत होती, ती संख्या आता दिवसाला ९० ते १०५ पर्यंत खाली आली आहे.

महापालिकेच्या कोविड चाचणी केंद्रात शनिवारी २५० नागरिकांच्या स्त्रावाचे नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी २२ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत. नगर शहरातील कोरोना बाधितांचा आकडा १६ हजार झाला आहे. यापैकी १४ हजार ५२२ रुग्ण बरे झाले आहेत. कोरोनामुळे शहरातील ३०६ जणांचा मृत्यू झाला आहे. दहा दिवसांत कोरोना बाधितांची संख्या स्थिर असून महापालिकेने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अभियान हाती घेतले आहे. त्यासाठी १७० पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. आरोग्य पथकामार्फत घर ते घर तपासणी करण्यात येत आहेत. आरोग्य पथकांना महापालिकेकडून एक हजार रॅपिड अँन्टीजेन किट देण्यात आल्या आहेत. सर्दी, खोकला, ताप, श्वास घेण्यास त्रास, यासारखी लक्षणे आढळून येणाऱ्यांची रॅपिड अँन्टीजेन तपासणी करण्यात येत आहे. तपासणीचा वेग वाढविण्यात आल्याने रुग्ण संख्या वाढेल, असा अंदाज होता. परंतु, रुग्णांची संख्या निम्म्याने घटल्याने आरोग्य यंत्रणेसह सर्वांनाच दिलासा मिळाला आहे. तपासणी केलेल्यांमध्ये रक्तदाब, मधुमेह यासारखे आजार असलेले ९ हजार ९ रुग्ण आढळून आले आहेत. अभियानातून आतापर्यंत १३२ जणांना कोविड चाचणी करण्याचा सल्ला आरोग्य पथकाकडून देण्यात आला आहे. अभियान दोन टप्प्यांत राबविण्यात येत असून, पहिला टप्पा १० ऑक्टोबरपर्यंत सुरु राहणार आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### शहरातील ५३ हजार घरांत पोहोचले अभियान



- नगर शहरातील ७५ हजार घरांत ३ लाख ९८ हजार नागरिक वास्तव्यास असल्याचा महापालिकेचा अंदाज आहे. यापैकी ५३ हजार ८८१ घरांमधील २ लाख १७ हजार ७७६ नागरिकांची तपासणी करण्यात आली आहे.
- तपासणी केलेल्या नागरिकांमध्ये कोरोना बाधित रुग्णांची संख्या कमी आहे. म्हणजे तपासणीचे नगर शहरातील काम ७५ टक्के पूर्ण झाल्याचे दिसते आहे.

लोकमत

मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु : सरासरी ७६७ मि.मी. पावसाची नोंद

# जिल्ह्यात ७१ टक्के जास्तीचा पाऊस

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** यंदा जिल्ह्यात मान्सूनच्या हंगामात म्हणजे जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरी ७६७.२ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. पावसाचे हे प्रमाण सरासरीच्या प्रमाणापेक्षा ७१ टक्के जास्त आहे. पावसाचा हंगाम संपल्यामुळे मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरवात झाली आहे. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे आणखी काही दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यात यंदा ७ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत ७६७.२ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. जिल्ह्यात साधारणपणे ४४८.५ मि.मी. एवढी पावसाची सरासरी आहे.

या सरासरीपेक्षा तब्बल ३१८.७ मि.मी. इतका जास्तीचा पाऊस झाला आहे. जास्तीच्या पावसाचे हे प्रमाण ७१ टक्के इतके आहे, असे जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाचे एकूण प्रमाण हे १७१.२ टक्के इतके आहे.

गतवर्षी ४८७.३ मि.मी. इतका पाऊस होता. म्हणजे केवळ आठ टक्केच जास्तीचा पाऊस होता. जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांच्या कालावधीत सरासरी ५२१.१ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. ३० सप्टेंबरला पावसाळा संपला असल्याने

## असा झाला तालुकानिहाय पाऊस

| तालुका | सरासरी (मि.मी.) | जास्तीचा पाऊस (टक्के) | तालुका | सरासरी (मि.मी.) | जास्तीचा पाऊस (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ८२७.४ | ७२.४ | राहुरी | ८५३.९ | ९७.८ |
| पारनेर | ७०२.७ | ६९.६ | संगमनेर | ६५२.४ | ८५.८ |
| श्रीगोंदा | ६५९.५ | ६३.७ | अकोले | ८३१.४ | ७०.२ |
| कर्जत | ५९६.५ | ३३.३ | कोपरगाव | ६७४.० | ६६.७ |
| जामखेड | ७३५.२ | २७.६ | श्रीरामपूर | ७२५.७ | ५६.७ |
| शेवगाव | ९६६.० | ०८.३ | राहाता | ७४७.८ | ६४.७ |
| पाथर्डी | ८३८.४ | ७७.२ | सरासरी | ७६७.२ | ७१.२ |
| नेवासा | १०४.१ | ११०.४ | | | |

## शेवगाव, नेवाशात सर्वाधिक पाऊस

यंदाच्या मान्सूनच्या हंगामात शेवगाव, नेवासा, अहमदनगर,पाथर्डी, अकोले या पाच तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला. मात्र साधारण सरासरीपेक्षा जास्तीचा पाऊस नेवासा तालुक्यात ११० टक्के, शेवगाव तालुक्यात १०८ टक्के, राहुरी तालुक्यात ९७ टक्के, पाथर्डी तालुक्यात ७७ टक्के, नगर तालुक्यात ७२ टक्के, अकोले तालुक्यात ७० टक्के पाऊस झाला आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील धरणे, तलाव, ओव्हरफ्लो झाले असून जिल्ह्यात ओल्या दुष्काळाची स्थिती आहे.

आता मान्सून परतीला निघाला आहे. या काळातही जोरदार पाऊस राहिल, असे हवामान खात्याने दिलेल्या अंदाजात म्हटले आहे.

लोकमत

# तिसऱ्या दिवशीही आंदोलनकर्ते सरणावरच

## प्रशासन घेईना दखल : ७४ लाखांच्या वाळूचा गैरव्यवहार

लोकमत न्यूज नेटवर्क

**राहुरी / सात्रळ :** महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनागोंदी कारभाराची व भ्रष्टाचाराची सखोल चौकशी व्हावी, यासाठी धानोरे येथील सामाजिक कार्यकर्ते सूर्यभान दिघे व आदिनाथ दिघे यांचे तिसऱ्या दिवशीही सरणावरती उपोषण सुरुच आहे. या आंदोलनाची प्रशासनाने अद्याप दखल घेतलेली नाही.

प्रवरा नदीपात्रातील ७४ लाखाच्या वाळू प्रकरणात गैरव्यवहार करणाऱ्या तत्कालीन कामगार तलाठ्यावर व त्यांना मदत करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. तोपर्यंत स्मशानातील उपोषण थांबणार नसल्याचे सूर्यभान दिघे यांनी सांगितले. धानोरे गावातील प्रवरा नदीपात्रातील नदीतून काही दिवसांपूर्वी उपसलेल्या वाळूला महसूलचे अधिकारी व कामगार तलाठी यांनी संगनमताने वाळू



तस्करांना मदत करत प्रचंड प्रमाणात वाळूचा उपसा केला आहे. ७४ लाख रुपयांची वाळू अवैध मार्गाने चोरीस गेली असताना कारवाई होत नसल्याने मागील वर्षी १५ जुलै २०१९ ला बापूसाहेब दिघे यांनी धानोरे येथील तलाठी कार्यालयासमोर उपोषण केले होते. तत्कालीन सर्कल व तलाठी यांनी या वाळू चोरी प्रकरणी पंचनामे

> महसूलच्या अधिकाऱ्यांनी प्रवरा नदीपात्रातील ७४ लाखाची वाळू चोरीचा पंचनामा करूनही संबंधितांवर वसुलीसाठी कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करतात. कारवाई करत नसल्यामुळे उपोषण करत आहोत.
>
> \- आदिनाथ दिघे, धानोरे

करून संबंधितांकडून वसुली करण्याचे आश्वासन दिले होते. काही वर्षाचा कालावधी उलटूनही महसूलच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी कोणतीही चौकशी केली नाही. वाळू चोरी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न चालवला असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. तिसऱ्या दिवशीही अंत्यविधीच्या जागेवर बेमुदत आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही. तोपर्यंत उपोषण चालूच राहणार आहे. आंदोलनास मुळा प्रवरा खोरे पर्यावरण संवर्धन समितीने पाठिंबा दिला आहे.

लोकमत

क्राईम रेट अहवाल : इतर गुन्ह्यांच्या बाबतीतही जिल्हा द्वितीय स्थानावर

# राज्यातील सर्वाधिक खून नगर जिल्ह्यात

प्रमोद आहेर ।
लोकमत न्यूज नेटवर्क



शिर्डी : राज्यात भौगोलिकदृष्ट्या मोठा असलेला नगर जिल्हा गुन्हेगारीतही अव्वल स्थानावर आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यांच्या आकडेवारीत मुंबईनंतर नगर दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात अहमदनगर जिल्ह्याने सर्वच जिल्ह्यांना मागे टाकले आहे.

राज्य पोलीस तिमाही अहवालानुसार जानेवारी ते मार्च - २०२० या तीन महिन्यात जिल्ह्याचा विचार करता नगर जिल्ह्यात सर्वाधिक २३ खुनाचे गुन्हे दाखल झाले. यातील २१ गुन्ह्यांची उकल झाली. दुसऱ्या स्थानावर असलेल्या नाशिक ग्रामीण, सोलापूर ग्रामीण व पुणे ग्रामीणमध्ये प्रत्येकी २१ खून झाले. त्यात सोलापूरमधील सर्व तर पुणे ग्रामीण व नाशिक ग्रामीणमधील १८ गुन्ह्यांचा छडा लागला. सिंधुदुर्ग, मुंबई रेल्वे, पुणे रेल्वे येथे प्रत्येकी एक खून झाला तर एकही खून न झालेले औरंगाबाद रेल्वे व नागपूर रेल्वे शेवटच्या स्थानावर राहिले.

मुंबई शहरात सर्वाधिक ३९ खून झाले. त्यातील ३५ गुन्ह्यांचा तपास लागला. यानंतर खुनांच्या आकडेवारीनुसार ठाणे, नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व सोलापूर शहराचा क्रमांक लागला.

गेल्या जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात मुंबई रेल्वे पोलिसात साडेसात हजार गुन्हे दाखल झाले. पावणेपाच हजार गुन्ह्यांची नोंद करत नगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर राहिला. जवळपास तीन हजार गुन्हे दाखल करून पुणे ग्रामीण तिसऱ्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर व सोलापूर ग्रामीण अनुक्रमे चौथ्या व पाचव्या स्थानावर आहे. या तीन महिन्यात ३८ व्या स्थानावरील सिंधुदुर्गात केवळ साडेतीनशे गुन्ह्यांची नोंद झाली.

आयुक्त कार्यालयात पावणेआठ हजार इतके उच्चांकी गुन्हे दाखल करून मुंबई शहर प्रथम स्थानावर आहे. या खालोखाल पुणे, ठाणे, नागपूर, पिंप्री चिंचवड, नाशिक, नवी मुंबई, सोलापूर, औरंगाबाद, अमरावती अशी क्रमवारी आहे.

## रिक्त जागांचा प्रश्न

मनुष्यबळाची व साधनसामग्रीची कमतरता आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने जिल्ह्याला गुन्हेगारीत अव्वल स्थान मिळवून दिले आहे. जिल्ह्यात केवळ तीस पोलीस ठाणी व तीन हजार कर्मचारी आहेत, सहा नवीन पोलीस ठाण्यांचे प्रस्ताव धूळखात पडले आहेत. उपअधीक्षक, निरीक्षक व सहाय्यक निरीक्षकाचे प्रत्येकी एक तर उपनिरीक्षकांच्या जवळपास तीस जागा रिक्त आहेत.

# करोनाबाधितांची संख्या घटली, मृत्युसंख्येत निम्म्याने घट

लोकसत्ता प्रतिनिधी

**नगर :** रॅपिड अँटिजेन व आरटी-पीसीआर चाचण्या वाढवूनही पूर्वीच्या तुलनेत करोनाबाधित रुग्ण आढळून येण्याचे प्रमाण जिल्ह्यात कमी झाले आहे. विशेष म्हणजे करोनामुळे होणारे मृत्यूही घटले आहेत. रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

मागील एका आठवड्यापासून करोनाबद्दल दिलासादायक असे चित्र आहे. रुग्णांची संख्या घटत असल्याने आता रुग्णांना खाटा उपलब्ध नाहीत, असे चित्र आहे. जिल्ह्यात खासगी रुग्णालये सुरुवातीला करोना रुग्णांवर उपचार करायला तयार नव्हती, पण गेल्या दोन महिन्यात अनेक खासगी रुग्णालयात करोनावर उपचार करण्यास सुरुवात झाली. अनेकांनी नव्याने खासगी करोना उपचार केंद्रे सुरू केली.



जिल्ह्यात नगर शहर, भेंडा (ता. नेवासे) देवळाली प्रवरा, राहुरी फॅक्टरी, राहुरी, श्रीरामपूर, कोपरगाव व संगमनेर, पारनेर आदी ठिकाणी खासगी करोना उपचार केंद्रे सुरू झाली. असे असले तरी करोना रुग्णांची संख्या घटली आहे.

नगर शहर व जिल्ह्यात दिवसाला एक हजारावर करोनाबाधितांची संख्या गेली होती, पण ही संख्या आता साडेचारशे ते साडेपाचशेच्या घरात मागील आठवड्यापासून आली आहे. रुग्णालयात जागाही भरपूर आहेत. जागा मिळत नाही ही अडचण दूर झाली आहे. जिल्ह्यात दररोज १४ ते १५ सरासरी मृत्यू होत होते, पण आता ही संख्या कमी झाली असून ७ ते ८ वर आली आहे.

### गाफील राहणार नाही-मायकलवार

करोनाबाधित रुग्णांची संख्या कमी झाली आहे. चाचण्यातही रुग्ण कमी आढळून येत आहेत. हे दिलासादायक चित्र आहे. पण तरीदेखील महापालिका गाफील राहणार नाही. सध्या घरोघरी जाऊन आरोग्य सर्वेक्षण सुरू आहे. १२० पथके त्याकरिता तैनात केली आहेत. प्रत्येक पथकाला किमान ५० चाचण्या करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे, असे महापालिका आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी सांगितले.

### रुग्णांची संख्या निम्म्याने घटली

करोना रुग्णांची संख्या घटत असून, आज नव्याने केवळ ४८१ रुग्ण आढळून आले. गेल्या महिन्याच्या तुलनेत ही आकडेवारी निम्म्याने कमी आहे. त्यामुळे बरे होणाऱ्या रुग्णांची टक्केवारी ९० वर गेली आहे. जिल्ह्यात आज ७५८ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची संख्या ४१ हजार ७५ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९०.२६ टक्के झाले आहे. आज नव्याने रुग्ण संख्येत ४८१ ने वाढ झाली.

### दररोज पाच हजार चाचण्या करणार

जिल्ह्यात पूर्वी दीड ते दोन हजार चाचण्या केल्या जात होत्या. ही संख्या साडेतीन हजार करण्यात आली. आता चाचण्यांची संख्या पाच हजार केली जाणार आहे. त्याकरिता मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. तसेच रुग्णसंख्या घटत असल्याने आता खाटा उपलब्ध आहेत. मात्र संख्या घटली हे अधिकृतपणे आताच सांगता येणार नाही. दररोज पाच हजार चाचण्या केल्यानंतर किती रुग्ण संख्या आहे, हे स्पष्ट होईल, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनील पोखरणा यांनी सांगितले.

करोनामुळे दररोज चौदा ते पंधरा लोकांना मृत्यू होत होता. त्यात सरकारी रुग्णालयातील निम्मे व खासगी रुग्णालयातील निम्मे रुग्ण होते. एकच विद्युतदाहिनी असल्याने अंत्यसंस्कार करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत होती. पण दि. २२ नंतर दुसरी विद्युतदाहिनी बसविण्यात आली. त्यामुळे आता प्रतीक्षा करावी लागत नाही. आता मृत्यूचे प्रमाण कमी झाले असून दररोज पाच ते सहाजणांचे मृत्यू होत आहेत, असे मुलतानचंद ट्रस्टचे स्वप्नील कुर्हे यांनी सांगितले.

लोकसत्ता Mon, 05 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55440396

# करोनाबाधितांची संख्या घटली, मृत्युसंख्येत निम्म्याने घट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नगर :** रॅपिड अँटिजेन व आरटी-पीसीआर चाचण्या वाढवूनही पूर्वीच्या तुलनेत करोनाबाधित रुग्ण आढळून येण्याचे प्रमाण जिल्ह्यात कमी झाले आहे. विशेष म्हणजे करोनामुळे होणारे मृत्यूही घटले आहेत. रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

मागील एका आठवडय़ापासून करोनाबद्दल दिलासादायक असे चित्र आहे. रुग्णांची संख्या घटत असल्याने आता रुग्णांना खाटा उपलब्ध नाहीत, असे चित्र आहे. जिल्ह्यात खासगी रुग्णालये सुरुवातीला करोना रुग्णांवर उपचार करायला तयार नव्हती, पण गेल्या दोन महिन्यात अनेक खासगी रुग्णालयात करोनावर उपचार करण्यास सुरुवात झाली. अनेकांनी नव्याने खासगी करोना उपचार केंद्रे सुरू केली. जिल्ह्यात नगर शहर, भेंडा (ता. नेवासे) देवळाली प्रवरा, राहुरी फॅक्टरी, राहुरी, श्रीरामपूर, कोपरगाव व संगमनेर, पारनेर आदी ठिकाणी खासगी करोना उपचार केंद्रे सुरू झाली. असे असले तरी करोना रुग्णांची संख्या घटली आहे.



नगर शहर व जिल्ह्यात दिवसाला एक हजारावर करोनाबाधितांची संख्या गेली होती, पण ही संख्या आता साडेचारशे ते साडेपाचशेच्या घरात मागील आठवडय़ापासून आली आहे. रुग्णालयात जागाही भरपूर आहेत. जागा मिळत नाही ही अडचण दूर झाली आहे. जिल्ह्यात दररोज १४ ते १५ जणांचे मृत्यू होत होते, पण आता ही संख्या कमी झाली असून ७ ते ८ वर आली आहे.

## गाफील राहणार नाही-मायकलवार

करोनाबाधित रुग्णांची संख्या कमी झाली आहे. चाचण्यातही रुग्ण कमी आढळून येत आहेत. हे दिलासादायक चित्र आहे. पण तरीदेखील महापालिका गाफील राहणार नाही. सध्या घरोघरी जाऊन आरोग्य सर्वेक्षण सुरू आहे. १२० पथके त्याकरिता तैनात केली आहेत. प्रत्येक पथकाला किमान ५० चाचण्या करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. असे महापालिका आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी सांगितले.

## रुग्णांची संख्या निम्म्याने घटली

करोना रुग्णांची संख्या घटत असून, आज नव्याने केवळ ४८१ रुग्ण आढळून आले. गेल्या महिन्यातल्या तुलनेत ही आकडेवारी निम्म्याने कमी आहे. त्यामुळे बरे होणाऱ्या रुग्णांची टक्केवारी ९० वर गेली आहे. जिल्ह्यात आज ७५८ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची संख्या ४१ हजार ७५ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९०.२६ टक्के झाले आहे. आज नव्याने रुग्ण संख्येत ४८१ ने वाढ झाली.

### दररोज पाच हजार चाचण्या करणार

जिल्ह्यात पूर्वी दीड ते दोन हजार चाचण्या केल्या जात होत्या. ही संख्या साडेतीन हजार करण्यात आली. आता चाचण्यांची संख्या पाच हजार केली जाणार आहे. त्याकरिता मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. तसेच रुग्णसंख्या घटत असल्याने आता खाटा उपलब्ध आहेत. मात्र संख्या घटली हे अधिकृतपणे आताच सांगता येणार नाही. दररोज पाच हजार चाचण्या केल्यानंतर किती रुग्ण संख्या आहे, हे स्पष्ट होईल, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुनील पोखरणा यांनी सांगितले.

करोनामुळे दररोज चौदा ते पंधरा लोकांना मृत्यू होत होता. त्यात सरकारी रुग्णालयातील निम्मे व खासगी रुग्णालयातील निम्मे रुग्ण होते. एकच विद्युतदाहिनी असल्याने अंत्यसंस्कार करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत होती. पण दि. २२ नंतर दुसरी विद्युतदाहिनी बसविण्यात आली. त्यामुळे आता प्रतीक्षा करावी लागत नाही. आता मृत्यूचे प्रमाण कमी झाले असून दररोज पाच ते सहाजणांचे मृत्यू होत आहेत, असे मुलतानचंद ट्रस्टचे स्वप्नील कुऱ्हे यांनी सांगितले.

लोकसत्ता Mon, 05 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55440396

# मिरी-तिसगाव रस्त्याच्या चौकशीचे आदेश

## राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अधिकाऱ्यांना खडसावले; पंधरा दिवसांत होणार दुरुस्ती

**मिरी : पुढारी वृत्तसेवा**

नगरविकास व ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मिरी-तिसगाव रस्त्याने शुक्रवारी प्रवास केल्यानंतर रस्त्याची दुर्दशा पाहून त्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी तत्काळ संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करून सदर रस्त्याच्या कामाची सखोल चौकशी करून कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच सदर रस्त्याची येत्या पंधरा दिवसांत तत्काळ दुरुस्ती करावी, अशा सूचना देखील केल्या आहेत.

मिरी-तिसगावची अत्यंत दुरवस्था झाल्याने 'पुढारी'चे प्रतिनिधी यांनी अभियंता मोहन पाटील यांच्याशी अनेक वेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु पाटील यांच्यासह इतर अधिकारी व ठेकेदार यांनी या गंभीर विषयाकडे जाणीवपूर्वक व हेतुपुरस्पर दुर्लक्ष केले होते.

पुढारी इफेक्ट

कुणीही दखल घेत नसल्याने 'पुढारी'ने 'मिरी-तिसगाव रस्त्याने प्रवास नको रे बाबा' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची गंभीर दखल घेत अनेकांनी संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. परंतु तरी देखील अधिकारी व ठेकेदारांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून आले होते.

शुक्रवारी तिसगाव येथील एका कार्यक्रमासाठी मंत्री तनपुरे यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर मिरी-तिसगाव या रस्त्याने प्रवास केला. थोड्याच अंतराचा प्रवास झाल्यानंतर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मेटाकुटीला आलेल्या मंत्री तनपुरे यांना रस्त्याची दुर्दशा चांगलीच लक्षात आली.

त्यांचा राग अनावर होऊन त्यांनी लगेचच संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करून तीव्र नाराजी व्यक्त केली. या रस्त्याच्या कामात दिरंगाई करणाऱ्या दोषी ठेकेदार, अधिकारी व रस्त्याच्या दर्जाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच या रस्त्याचे काम ठेकेदाराकडून पंधरा दिवसांच्या आत करून घ्यावे, अशा सूचना देखील केल्या आहेत.

कडगाव (ता.पाथर्डी) येथे झालेल्या एका कार्यक्रमात देखील मंत्री तनपुरे यांनी रस्त्याचे काम निकृष्ट झाल्यास गाठ माझ्याशी राहील असा इशारा दिला होता.

### 'पुढारी'मुळे रस्त्याच्या विषयाला वाचा

मिरी-तिसगाव रस्त्याला जागोजागी खड्डे पडल्याने वाहनधारकांचे हाल होत आहे. या विषयाला खऱ्या अर्थाने वाचा फुटली, ती 'पुढारी'मुळे. वेळोवेळी वृत्त प्रकाशित केल्याने मंत्री तनपुरे यांनी तत्काळ येत अधिकाऱ्यांना तत्काळ दुरुस्तीचे आदेश दिले. त्यामुळे आम्ही दैनिक पुढारीचे आभार मानतो.

- अमोल वाघ, सरपंच, [illegible] खालसा

पुढारी

# राज्यभरात मराठा आरक्षणासाठी एल्गार

## जिल्ह्यातील तहसील कार्यालयांसमोर आज होणार धरणे आंदोलन

नगर : पुढारी वृत्तसेवा

मराठा आरक्षणासह समाजाच्या विविध मागण्यांसाठी सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने आज (दि.५) सकाळी ११ वाजता राज्यभरात सर्व तहसील कार्यालयांवर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर रोजी मराठा आरक्षण अंमलबजावणीला स्थगिती दिल्याने मराठा समाजात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच केंद्र सरकारने मराठा आरक्षणास संरक्षण देण्यासाठी संसदेत स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणीही करण्यात आल्याची माहिती समन्वयक संजीव भोर यांनी दिली.




आरक्षणास स्थगिती मिळाल्याने एसईबीसी प्रवर्गातून शैक्षणिक प्रवेशासाठी अर्ज केलेल्या मराठा विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने आपल्या नियंत्रणाखालील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये १२ टक्के जागा मराठा विद्यार्थ्यांसाठी वाढवाव्यात. आरक्षणास स्थगिती असेपर्यंत पोलिस भरती व इतर नोकर भरती करू नये. ही स्थगिती उठल्याशिवाय एमपीएससीच्या परीक्षा घेऊ नयेत. ११ ऑक्टोबर रोजी व नजिकच्या काळात होत असलेल्या एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात.

मराठा समाजास इडब्ल्यूएसमध्ये नव्हे, तर हक्काचे स्वतंत्र आरक्षण मिळाले पाहिजे. स्थगिती देण्यापूर्वी झालेले शैक्षणिक प्रवेश व नोकर भरती प्रक्रियांमध्ये मराठा समाजातील एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या व लाभ द्यावेत. सारथी संस्था व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास भरीव निधी देण्यात यावा. मराठा आरक्षण सुनावणीसाठी घटनापीठ स्थापन करणे व स्थगिती उठण्यासाठी आग्रही पाठपुरावा करावा. मराठा विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र अद्ययावत वसतिगृहे तात्काळ सुरू करावीत. कोपर्डी अत्याचार घटनेतील आरोपींवरील मुंबई उच्च न्यायालयातील खटल्याचे कामकाज जलद गतीने सुरू करावे, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

My Ahmednagar Edition
Oct 5, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# अकोलेचा पठार भाग आजही 'नॉट रिचेबल'

## स्वातंत्र्याची चौऱ्याहत्तरी ओलांडूनही आदिवासी नागरिक सुविधांपासून वंचित

**बेलापूर बदगी : दादाभाऊ फापाळे**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे पूर्ण होऊनही अकोले तालुक्यातील पठार भाग आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. बेलापूर, जायकवाडी, बैलजाबू, ब्राह्मणवाडा, पळसवाडी, करंडी, काळेवाडी, खांबाडे अशी गावे आजही मोबाईल नेटवर्कसाठी, पठार भागात फिरत आहेत.

आज पाल देश मोदींच्या नेतृत्वाखाली डिजिटल इंडियाकडे वाटचाल करीत असताना आजही बेलापूर येथे आयडिया, बीएसएनएल, जिओ, कंपनीचे नेटवर्क टॉवर आहे. नेटवर्कसाठी बेलापूर परिसरातील अनेक गावे या टॉवरवर अवलंबून आहेत. या परिसरात तीन टॉवर असूनही मोबाईल नेटवर्क ग्राहकांना पुरेशी रेंज मिळत नाही.

आयडिया ग्राहक एकमेकांशी संवाद साधत असताना मध्येच मोबाईल कट होणे, मोबाईल न लागणे, रेंज न मिळणे आणि इंटरनेट न चालण्याच्या तक्रारी ग्राहक, तसेच शेतकरी वर्ग आणि विद्यार्थ्यांकडून येत आहेत.

सध्या कोरोनाच्या महामारीमुळे सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण चालू आहे. अशा परिस्थितीत पठार भागात टॉवर असूनही नेटवर्क मिळत नसल्याने विद्यार्थी वर्गात ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहावे लागते की काय, अशी भीती पालकांच्या मनात भेडसावत आहेत.

टॉवर नेटवर्कमुळे या परिसरात असलेल्या गावातील मोबाईल ग्राहकांना नेटवर्कच्या मोठ्या प्रमाणावर अडचणीत सामोरे जाऊन आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. महिन्याचे मोठे पॅकेज रिचार्ज करूनही कालीच वापर होत नसल्याने परिसरातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी, तसेच विद्यार्थी व ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

या परिसरातील आयडिया ग्राहकांनी अनेकदा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याची ग्राहकांची तक्रार आहे.

या परिसरात ग्राहकांना सुविधा पूर्ववत करून चांगली सुविधा मिळावी, अशी मागणी आयडियाच्या इतर कंपनीकडे ग्राहकांनी केली आहे.



### आयडिया कंपनीने सुविधा द्यावी : काळे

आयडिया कंपनीच्या भोंगळ कारभाराने अनेक ग्राहकांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सोसावे लागले आहेत. त्याची भरपाई कंपनीने करून द्यावी. नेटवर्क सुविधा देऊ शकत नसेल, तर पूर्णपणे बंद करावी. शेतकरी वर्गाची लूट थांबवावी, असे राष्ट्रीय छावा संघटना संपर्क प्रमुख भगवान काळे यांनी सांगितले.

### ..अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन

आयडिया कंपनीच्या नेटवर्क अडचणीमुळे विद्यार्थी मुलांचे फार मोठ्या प्रमाणावर शालेय नुकसान झाले आहे. ऑनलाईन शिक्षणास फार मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लवकरात लवकर सुविधेत बदल झाला नाही, तर मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल, महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा उपाध्यक्ष अशोक फापाळे यांनी सांगितले.

# दिवसभरात ५९८ रुग्णांची वाढ

## कोरोना रुग्णांनी ओलांडला ४६ हजारांचा टप्पा; चार जणांचा मृत्यू

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या कमी होण्यास तयार नाही. रविवारी (दि.४) दिवसभरात ५९८ रुग्णांची वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण कोरोनाबाधितांची संख्या ४६ हजार १०४ इतकी झाली आहे. काल ४ रुग्णांचा मृत्यू झाल्याने मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या ७३६ झाली आहे. तर, ३ हजार ९३५ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.



जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना चाचणी प्रयोगशाळेमध्ये बाधित आढळून आलेल्या १११ रुग्णांमध्ये नगर शहर ५०, अकोले १६, जामखेड १, कोपरगाव २, नगर ग्रामीण २, नेवासे ५, पारनेर १, पाथर्डी ५, राहाता १, राहुरी १, संगमनेर २, शेवगाव ११, श्रीगोंदे ७, श्रीरामपूर १, मिलिटरी हॉस्पिटल ६ रुग्णांचा समावेश आहे.

खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत १६० रुग्ण आढळून आले. यामध्ये नगर शहर ३३, अकोले ४, जामखेड २, कर्जत ६, कोपरगाव ५, नगर ग्रामीण २१, नेवासे ६, पारनेर ६, पाथर्डी २, राहाता ३३, राहुरी ११, संगमनेर १५, शेवगाव २, श्रीगोंदे ३, श्रीरामपूर ११ रुग्णांचा समावेश आहे.

अँटीजेन चाचणीत ३२७ जण बाधित आढळून आले. यामध्ये नगर शहर १२, अकोले २२, जामखेड ४६, कर्जत ३६, कोपरगाव ११, नगर ग्रामीण १०, नेवासे २, पारनेर ५, पाथर्डी ४१, राहाता ७, संगमनेर २२, शेवगाव ३८, श्रीगोंदे ५१, श्रीरामपूर २१ रुग्णांचा समावेश आहे.

दरम्यान, ३५८ रुग्णांना बरे झाल्यामुळे डिस्चार्ज मिळाला. यामध्ये नगर शहर ५०, अकोले ३०, जामखेड १७, कर्जत २८, कोपरगाव २०, नगर ग्रामीण २३, नेवासे १५, पारनेर ८, पाथर्डी ३४, राहाता ३८, राहुरी ७, संगमनेर ३८, शेवगाव २४, श्रीगोंदे २०, श्रीरामपूर २, भिंगार ४ रुग्णांचा समावेश आहे.आतापर्यंत ४१ हजार ४३३ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८९.८७ टक्के झाले आहे.

# जिल्ह्यात ३५८ जणांना डिस्चार्ज तर ५९८ कोरोनाबाधितांची भर

**अहमदनगर :** जिल्ह्यात काल ३५८ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४१ हजार ४३३ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ८९.८७ टक्के इतके झाले आहे. दरम्यान, शनिवारी सायंकाळी सहा वाजले पासून काल सायंकाळी सहा वाजेपर्यंत रूग्ण संख्येत ५९८ ने वाढ झाली. यामुळे बाधितांची एकूण संख्या आता ४६ हजार १०४ झाली असून सध्या ३ हजार ९३५ जणांवर उपचार सुरू आहेत.



काल जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये १११, खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत १६० आणि अँटीजेन चाचणीत ३२७ रुग्ण बाधीत आढळले.जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये बाधीत आढळून आलेल्या रुग्णामध्ये मनपा ५०, अकोले १६, जामखेड १, कोपरगाव २,नगर ग्रामीण २, नेवासा ५, पारनेर १, पाथर्डी ५, राहाता १, राहुरी १, संगमनेर २, शेवगाव ११, श्रीगोंदा ७, श्रीरामपूर १, मिलिटरी हॉस्पिटल ६ अशा रुग्णांचा समावेश आहे. खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्यामध्ये, मनपा ३३, अकोले ४, जामखेड २, कर्जत ६, कोपरगाव ५, नगर ग्रामीण २१, नेवासा ६, पारनेर ६, पाथर्डी २, राहाता ३३, राहुरी ११, संगमनेर १५, शेवगाव २, श्रीगोंदा ३, श्रीरामपूर ११ अशा रुग्णांचा समावेश आहे. अँटीजेन चाचणीत बाधित आढळुन आलेल्यामध्ये, मनपा १२, अकोले २२, जामखेड ४६ कर्जत ३६, कोपरगाव ११, नगर ग्रामीण १०, नेवासा २, पारनेर ५, पाथर्डी ४१, राहाता ७, संगमनेर २२, शेवगाव ३८, श्रीगोंदा ५१, श्रीरामपूर २९ अशा रुग्णांचा समावेश आहे. दरम्यान काल सायंकाळपर्यंतच्या चोविस तासात आणखी चार जणांचा दुर्देवी मृत्यू झाला. मृत्यूमुखी पडलेल्यांची एकूण संख्या आता ७३६ झाल्याचे कालच्या आहवालात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काल ३५८ रुग्णांना बरे झाल्यामुळे डिस्चार्ज मिळाला. यामध्ये मनपा ५०, अकोले ३०, जामखेड १७, कर्जत २८, कोपरगाव २०, नगर ग्रामीण २३, नेवासा १५, पारनेर ८, पाथर्डी ३४, राहाता ३८, राहुरी ७, संगमनेर ३८, शेवगाव २४, श्रीगोंदा २०, श्रीरामपूर २, कँटोन्मेंट ४ अशा रुग्णांचा समावेश आहे.

# मास्क न वापरणाऱ्यांवर कारवाई

## मंत्री प्राजक्त तनपुरे ; राहुरी, देवळाली प्रवरा, वांबोरीमध्ये जास्त रुग्ण

**सकाळ वृत्तसेवा**



प्राजक्त तनपुरे

राहुरी, ता. ४ : कोरोनाचे अनलॉक सुरू असल्याने गर्दी वाढत आहे. परिणामी, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. मास्क वापरणे बंधनकारक असले, तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. राहुरी, देवळाली प्रवरा व वांबोरी येथे कोरोनाबाधितांची संख्या जास्त आहे. तेथे उद्यापासून (सोमवार) मास्क न वापरणाऱ्या नागरिकांवर प्रशासनातर्फे कारवाईची मोहीम सुरू होणार आहे. कटुता टाळण्यासाठी नागरिकांनी मास्क वापरावे, असे आवाहन नगरविकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केले आहे.

राहुरी तहसील कार्यालयात आज (रविवारी) 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' अभियानाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री तनपुरे बोलत होते. तहसीलदार फसियोद्दीन शेख, पोलिस निरीक्षक मुकुंद देशमुख, राहुरी पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. श्रीनिवास कुरे उपस्थित होते.

मंत्री तनपुरे म्हणाले, ''कोरोनाच्या भीतीने आजारी नागरिक कोरोना तपासणी व उपचारास विलंब करतात. त्यामुळे कोरोनाचा मृत्यूदर वाढत आहे. राहुरी, देवळाली प्रवरा व वांबोरी येथे नगरसेवकांनी पुढाकार घेऊन, त्यांच्या प्रभागात कोरोना तपासणी मोहीम राबवावी. त्यांना शासनातर्फे रॅपिड ॲंटिजेन चाचण्यांची किट उपलब्ध करून दिली जातील. तरुणांनी काळजी घ्यावी. त्यांची प्रतिकारशक्ती चांगली असली, तरी घरातील वयस्क व्यक्तींना संसर्ग होऊन, कोरोना जीवघेणा ठरत आहे.''

तहसीलदार शेख म्हणाले, ''कोरोना तपासणीत तालुक्यात १२.७३ टक्के लोक बाधित आढळले. जिल्ह्यात ही सर्वांत कमी टक्केवारी आहे. तालुक्यात सध्या १८१ ॲक्टिव्ह